पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: registrar@sus.ac.in bos@sus.ac.in

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

अभ्यासमंडळे विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०१९/6155 दिनांक : 8 AUG 2019

आत्यंत तातडीचे

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर

विषय: प्रवेशित विद्यार्थ्यांकडून अधिकचे शुल्क न-घेणेबाबत.
वाचा: या कार्यालयाचे जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०१९/५०३० दि.२८/०६/२०१९ चे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या शिक्षण शुल्कामध्ये तूर्तास कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येऊ नये. सदरचे शिक्षण शुल्क गत शैक्षणिक वर्षामध्ये आकारलेल्या शुल्काप्रमाणे आकारण्यात यावे, असे कळविण्यात आले होते.

परंतू विविध विद्यार्थी संघटनांनी, विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या लेखी निदर्शणास असे आणून दिले आहे की, काही महाविद्यालये शुल्क आकारणीत परस्पर वाढ करुन अधिकचे शुल्क प्रवेशित विद्यार्थ्यांकडून वसूल करत आहेत. ही बाब अत्यंत गंभीर असून, सदरबाब विद्यापीठाच्या सकृतदर्शनी निदर्शणास आल्यास संबंधित महाविद्यालयावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशान्वये,

(डॉ. वि. भा. घुटे)
कुलसचिव

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in ई-मेल: bos@sus.ac.in

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

## अभ्यासमंडळे विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०१९/ 5030 दिनांक : 28 JUN 2019

तात्काळ

प्रति,
**मा. प्राचार्य/प्राचार्या,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर

**विषय: महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या शिक्षण शुल्कामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ न- करणेबाबत.**

संदर्भ: दि.१८/०६/२०१९ रोजी शुल्क निर्धारण समितीची बैठक

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भीय बैठकीच्या अनुषंगाने आदेशान्वये कळविण्यात येते की, दि.१८/०६/२०१९ रोजी दुपारी ३:०० वा. प्रस्तुत विद्यापीठात शुल्क निर्धारण समितीची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीच्या कार्यवृत्तांताची प्रक्रिया सुरु असून तद्‌नंतर सदर समितीत पारित झालेले ठराव विविध प्राधिकरणातून मान्य करुन घेणे आवश्यक आहे.

तरी शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या शिक्षण शुल्कामध्ये तूर्तास कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येऊ नये. सदरचे शिक्षण शुल्क गत शैक्षणिक वर्षामध्ये आकारलेल्या शुल्काप्रमाणे आकारण्यात यावेत.

आदेशान्वये,

(डॉ. वि. भा. घुटे)
कुलसचिव